# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**3 JULY, 2018**

[Time : 09-00]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(40 Words Per Minute)

**SECTION - II**

(Time Allowed : 7 Minutes)

**मराठी टंकलेखन**

(४० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - २**

(वेळ : ७ मिनिटे)

**सूचना** : गती उतारा टंकलिखित करुन झाल्यावर पुन्हा तोच उतारा टंकलिखित करु नये. पुढील मजकूर डाव्या बाजूस १५ पदे समास सोडून द्विपंक्ती अंतराने टंकलिखित करा.

---

[गुण : ४०]

माणसाचं आयुष्य केवळ क्षणभंगूर आहे हे निसर्गाच्या चिंतनामुळेच कळतं. तरी देखील ते सुंदर आहे. त्याचा मूळ गाभा सुंदर आहे. पण आहे ते मुळात सुंदरच एखाद्या वेठविगार माणसाच्या मुलाला जणवतं त्याप्रमाणे जीवन हे जन्मत:च ओझं आहे, काही दुदैवी लोकांसाठी. जन्मत: ते कुणाचे तरी गुलाम म्हणून जन्माला आले आहेत. कुणाचं तरी देणं त्यांच्या डोक्यावर आहे. अशा दुदैवी लोकांसाठी जीवन म्हणजे मोठा वनवास. त्यांना जीवनाचं सौंदर्य नाही आकळू शकत. असे लोक जीवनाचाच विध्वंस करायला निघतात.

एक मनुष्य अखंड जेवतो आणि दुसरा सतत उपाशी राहतो हे निसर्गाला कधीच मंजूर नाही. एक मनुष्य दुसऱ्याचा मालक होऊ शकतो, हे निसर्गाला कधीच मंजूर नाही. प्रत्येक जण स्वयंभू आहे. त्याचं अस्तित्व कुणाच्या दयेवर उभं नाही. एखादं उंच वडाचं झाड केवळ आकारानं, सामर्थ्यानं मोठं आहे, म्हणून त्याचं मोल जुईंच्या फुलापेक्षा जास्त आहे असं नाही. निसर्गाला जाती मंजूर नाहीत, तसाच धर्मही मंजूर नाही. मी तुझ्यापेक्षा पवित्र आहे. अस सांगण्याच्या अहमहमिकेनं माणसानीच धर्म निर्माण केले, पंथ निर्माण केले. निसर्गाला कुठला आला आहे धर्म ? धर्म असलाच तर "जगा आणि जगू दया" एवढाच असू शकतो. मानवी पवित्र्याच्या कल्पनेनं निसर्ग बंदिस्त नाही, परंतु त्याच्या दृष्टीनं जीवनच पवित्र आहे. माणसांनी या पृथ्वीवर कसं जगावं हे शेवटी माणसांनीच ठरवायचं आहे.

निसर्गाशी फक्त इतकीच अपेक्षा आहे की, फुलं ज्या सहजपणानं फुलतात, सहज रंग धारण करतात, सहजतेन विकसित होतात, त्याप्रमाणे जीवन फुलावं. फुलण्यचा, बहरण्याचा अधिकार कुणी हिरावून घेऊ नये.

---